# वर्धा जिल्हा परिषद
## ऐम्प्लॉईज (अर्बन) को–ऑपरेटिव्ह बँक लि.,वर्धा.

मुख्यालय : महादेवपूरा, वर्धा, दूरध्वनी : ०७१५२–२९५५५०

## आलेख २०२४–२०२५

### खर्चाचा रुपया

| | |
|---|---|
| ठेवीवरील व्याज | ४४.९७% |
| कर्मचारी पगार व भत्ते | १७.५३% |
| संचालक भत्ते | ००.४६% |
| भाडे /कर/विमा | ००.४६% |
| कायदा व सल्लागार फी | ००.०१% |
| टेलीफोन /टपाल | ००.०३% |
| घसारा | ०१.५६% |
| जाहीरात | ००.०७% |
| इतर खर्च | ०८.२७% |
| तरतुदी | १२.८९% |
| नफा | १३.७५% |




### उत्पादनाचा रुपया

| | |
|---|---|
| कर्जावरील व्याज | ७२.२८% |
| गुंतवणूकीवर व्याज | २०.१३% |
| इतर उत्पन्न | ०७.५९% |




प्रेषक :–
मुख्य कार्यकारी अधिकारी
वर्धा जिल्हा परिषद ऐम्प्लॉईज (अर्बन)
को–ऑपरेटिव्ह बँक लि.वर्धा.
महादेवपूरा,वर्धा –४४२००१

प्रति,
श्री/श्रीमती ____________________

बुक-पोस्ट

# वर्धा जिल्हा परिषद
## ऐम्प्लॉईज (अर्बन) को-ऑपरेटिव्ह बँक लि., वर्धा.

मुख्यालय : महादेवपूरा, वर्धा, दूरध्वनी : ०७१५२–२९५५५०

Regd. No.WDA/BNK/109, R.B.I. Licence Number UBD/MH/378/P




## वार्षिक सर्वसाधारण सभा

रविवार, दि. ०७ सप्टेंबर २०२५ सभेची वेळ : दुपारी १.०० वा.
स्थळ : मातोश्री सभागृह आर्वी रोड, वर्धा.

# संचालक मंडळ
## ११/०७/२०२३ पासून



**मोहन वसंतराव कुंभारे**
अध्यक्ष
मो.९२८४६७७४५५



**रामदास ता. खेकारे**
उपाध्यक्ष
मो.९९२३३८३६५९



**पंढरी आ. तडस**
संचालक
मो.९९७०५३६३२१



**अतुल पं. उडदे**
संचालक
मो.७५११९८६८५५



**मनिष प्र. वाकरे**
संचालक
मो.९४२२३८६१७१



**राकेश शं. साटोणे**
संचालक
मो.८००७१०००१४



**अजय दा. मावंडे**
संचालक
मो. ९३७३४३३३८४



**संतोष मा. डंभारे**
संचालक
मो.९९६००४११७०



**सचिन आ. शंभरकर**
संचालक
मो.७५०२६९३२४७



**यशवंत कृ. कुकडे**
संचालक
मो.९८२२३८०४६८



**सुवर्णा श्री. अहेरराव**
संचालिका
मो.९१२११३३६०६



**वंदना मु. कोल्हे**
संचालिका
मो.९६६५२०११७५



**निलेश रा.चव्हाण**
संचालक
मो.९७६४९४७९२१



**गौतम ज्ञा. पाटील**
संचालक
मो.९४२३४२०४५९



**श्री. अरुण ता. झोटींग**
संचालक
मो.९९६०११०४९५



**हर्षद प्र. हिवरे**
मु.का.अ.
मो.८६०००९६३८४



बँकेचे अध्यक्ष **मा. श्री. मोहन कुंभारे**
**५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस**
संबोधित करतांना तसेच उपस्थित
सर्व सन्मा. संचालक मंडळातील सदस्य.

बँको ब्ल्यू रिबन हा मानाचा
**३०० कोटी ठेवी गटात प्रथम पुरस्कार**
२०२४-२०२५ करिता बँकेस प्राप्त झाला.





बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी
**श्री. भास्कर नानाजी झाडे**
सेवानिवृत्त झाल्या कारणाने
**५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये**
त्यांच्या सेवाकाळात बँकेस दिलेल्या
भरीव योगदानाबद्दल त्यांचा सर्व संचालकाच्या
वतीने गौरव करण्यात आला.

बँकेचे माजी कर्मचारी
**श्री. विठ्ठल चंपतराव गव्हाळे**
सेवानिवृत्त झाल्या कारणाने
**५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये**
त्यांच्या सेवाकाळात बँकेस दिलेल्या
भरीव योगदानाबद्दल त्यांचा सर्व संचालकाच्या
वतीने गौरव करण्यात आला.



# वर्धा जिल्हा परिषद एम्प्लॉईज(अर्बन)को-ऑप बँक लि.वर्धा

मुख्यालयःमहादेवपूरा,वर्धा,दुरध्वनी क्र.०७१५२-२९५५५०

Website :www.wzpebank.com
email:wzpebank@wzpebank.com

जावक क्र./वा.सर्व.साधा.सभेची सूचना/२१४/२५-२६
दिनांक २०/०८/२०२५

## -ःवार्षिक सर्वसाधारण सभेची सुचनाः-

वर्धा जिल्हा परिषद एम्प्लॉईज(अर्बन)को-ऑप बँक मर्यादित वर्धाच्या सर्व भागधारक सभासदांना सुचित करण्यात येते की ,बँकेची **५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०७ संप्टेंबर २०२५ रोजी** दुपारी ०१.०० वाजता **मातोश्री सभागृह,आर्वी रोड,वर्धा** येथे **अध्यक्ष श्री.मोहन वसंतराव कुंभारे** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार विनिमय करण्यास बोलविण्यात आलेली आहे.

कृपया सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**सभेची विषयसुची:-**

**विषय क्र.१-** मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२२/०९/२०२४ चे सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**विषय क्र.२-** बँकेच्या ३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा अहवाल,ताळेबंद पत्रक,नफातोटा पत्रकास मंजुरी देणे.

**विषय क्र.३-** बँकेच्या सन २०२४-२०२५ सालाच्या मंजुर अर्थसंकल्पापेक्षा प्रत्यक्षात जास्तीच्या झालेल्या खर्चास समंती देणे व सन २०२५-२६ सालाच्या अर्थसंकल्पास मंजुरी देणे

**विषय क्र.४-** बँकेच्या संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२४-२५ चे निव्वळ नफ्याचे वाटणीपत्रकास मंजुरी देणे.

**विषय क्र.५-** बँकेच्या सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता सनदी लेखापालाने केलेल्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेवुन बँकेनी केलेल्या दोष दुरूस्ती अहवालास मंजुरी देणे.

**विषय क्र.६-** बँकेचे सन २०२५-२०२६ या आर्थीक वर्षाकरीता संचालक मंडळाने शिफारस केल्यावरूण आरबीआय चे निर्देशा नुसार वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणुक होत असल्यावरूण त्यास अधिन राहुन आपले अनुसमर्थन देणे.

**विषय क्र.७-** **आधार** सभासद कल्याण योजनेस मंजुरी देण्याबाबत.

**विषय क्र.८-** वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थितीस क्षमापित करणे.

**विषय क्र.९-** मा.अध्यक्ष साहेबांचे अनुमतीने वेळेवर येणारे अन्य विषय.

**संचालक मंडळाचे आदेशावरून**
स्वा.
**हर्षद प्र.हिवसे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**वर्धा जिल्हा परिषद एम्प्लॉईज(अर्बन)को-ऑप बँक लि.वर्धा**

**स्थळ :- वर्धा**
**दिनांक :- २०/०८/२०२५**

सुचनाः

१)सभेची गणपुर्तीची संख्या १०० असून गणपुर्तीअभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी त्याच विषयसुचीनुसार बँकेच्या पोटनियमातील तरतुदीनुसार घेतली जाईल.या सभेमध्ये विषयसुचीतील विषयांचाच विचार करण्यात यईल.

२) ज्या सभासदांना अहवाल वर्षातील विषयसुचीनुसार प्रश्न विचारावयाचे असल्यास ते त्यांनी दिनांक २८/०८/२०२५ दुपारी १२ वाजेपर्यंत(सुट्टीचे दिवस वगळता)बँकेच्या वर्धा येथील वरील मुख्यालयीन पत्त्यावर कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात आणून द्यावेत.किंवा बँकेच्याemail:wzpebank@wzpebank.com वर आपले प्रश्न परिपुर्ण असल्याची खात्री करून पाठवावे.

३) दरवर्षी विद्यार्थी गुणगौरव योजनेनुसार सभासदांचे पाल्य तसेच जि.प.वर्धाचे आदर्श/गुणवंत कर्मचारी(सभासद)यांनी सभेच्या नियोजित वेळेपेक्षा एक तास आधी उपस्थित राहावे.

**स्वा.**
**हर्षद प्र.हिवसे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**वर्धा जिल्हा परिषद एम्प्लॉईज(अर्बन)को-ऑप बँक लि.वर्धा**

# वर्धा जिल्हा परिषद अेम्प्लॉईज(अर्बन)को-ऑप बँक लि.वर्धा

## (५८ वी) वार्षीक सर्वसाधारण सभा दि.२२/०९/२०२४ चे इतिवृत्त

वर्धा जिल्हा परिषद अेम्प्लॉईज (अर्बन)को–ऑप.बँक लि.वर्धा ची वार्षीक सर्वसाधारण सभा बँकेचे अध्यक्ष श्री.मोहन वसंतराव कुंभारे यांचे अध्यक्षतेखाली रविवार दि.२२ संप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १:०० वाजता मातोश्री सभागृह आर्वी रोड,वर्धा येथे घेण्यात आली.सदर सभेला ३४२ सभासदांची उपस्थिती होती.

बँकेचे अध्यक्ष श्री.मोहन वसंतराव कुंभारे यांनी संचालक मंडळाच्या वतीने सर्व उपस्थित मान्यवरांचे बँकेचे अध्यक्ष या नात्याने मनपुर्वक स्वागत केले तसेच उपस्थित सर्व सन्मा.सभासदांना स्थान ग्रहण करण्याची विनंती केल्यानंतर उपाध्यक्ष श्री.रामदास ता.खेकारे व सर्वश्री सन्मा.संचालक तसेच सभासदांच्या उपस्थितीत सभेच्या पारंपारीक प्रथेप्रमाणेच दीप प्रज्वलन करून सरस्वती पुजन करण्यात आले. तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यापर्ण केले.यानंतर विद्यार्थी गुणगौरव योजनअंतर्गत सभासदांचे पाल्य ज्यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत उल्लेखनिय गुण प्राप्त केले अशा विद्यार्थ्यांचा प्रत्येकी १000/– चा धनादेश व मोमेंटो देवून त्यांचा गुणगौरव करण्यात आला.सोबतच अहवाल वर्षात जि.प.वर्धानी आदर्श शिक्षक म्हणून ०८ शिक्षक ,आदर्श आरोग्य कर्मचारी ०१ तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिक्षक गुणगौरव पुरस्कार अंतर्गत ०२ शिक्षक, जिल्हा परिषद उत्कृष्ठ कनिष्ठ सहाय्यक ०१ , पंचायत राज मार्फत गुणवंत अधिकारी ०१ यांचा सत्कार करण्यात आला.या वित्तीय वर्षात आदर्श ग्रामसेवक निवडीबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही तसेच पशुसंवर्धन विभागामार्फत निवडीबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.असे मा.उपमुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.वर्धा यांनी बँकेस पत्राने कळविले आहे त्यामुळे आदर्श ग्रामसेवक यांचा सत्कार बँकेस करता आला नाही. व सत्कार सोहळा कार्यक्रम ठिक १:०० वाजता संपन्न झाला ,यानंतर सभेचा कोरम पूर्ण झाल्यावरूण मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी मा.अध्यक्षांना सभा कामकाज सुरू करण्याची विनंती केली अध्यक्षांनी सर्व सन्मा.सभासद व ठेविदार यांचे अभिनंदन करून सभेच्या कामकाजास रितसर सुरूवात केली.तत्पूर्वी अध्यक्षांचे प्रस्तावानुसार अहवाल वर्षात ज्या सन्मा.भागधारक सभासदांचे तसेच आंतरराष्ट्रीय महनिय किर्तीच्या थोर विभुतींचे दुखःद निधन झाले अश्यांच्या स्मृतीस सभागृहांने श्रध्दांजली अर्पण केली.

विषय निहाय कामकाज चालू होण्यापूर्वी अध्यक्षांनी आपले प्रास्ताविक केले व आपले प्रास्ताविकेतून त्यांनी सर्व सन्मा.सभासदांना कर्जवसूली वेळेवर भरण्याचे आव्हान केले तसेच सन्मा.सभासदांनी विषयसुची निहाय चर्चेत भाग घ्यावा व सहकार्य करावे ही विनंती केली. त्यानुसार मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी अहवाल पुस्तकातील पान क्र.११ व २३ वरील दुरूस्ती सांगितली त्यानंतर अध्यक्षांनी रितसर विषय सुचीनुसार सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.सभा सुरू होण्यापूर्वी सन्मा.सभासद श्री.रविंद्र राठोड यांनी अहवाल पुस्तीकेत पान क्र.१५ वर कर्जधोरणामध्ये १५ लाखाचेवर २० लाख कर्ज वाटप अशी दुरूस्ती घ्यावी असे सुचविले.

**विषय क्रमांक १) मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १७/०९/२०२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

अध्यक्षांनी विषद केले की वार्षिक सर्व साधारण सभेची अहवाल पुस्तीका मागील वर्षी प्रमाणेच सर्व जिल्हा परिषद वर्धाचे कार्यालयातील तसेच प्रत्येक शाळेमध्ये बँकेच्या कर्मचाऱ्यांनी अहवाल पुस्तीका ह्या निर्धारीत मुदतीत प्रत्यक्ष जावून वाटल्या तरी विषयांकित प्रकरणी मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १७/०९/२०२३ चे इतिवृत्त आपणास अहवाल पुस्तकात दिलेले आहे ते पान २ ते ११ वर आहे तरी यास कायम करण्याबाबत सभागृहानी मंजुरी प्रदान करावी अशी विनंती केली.

यावर सन्मा.सभासद श्री.राठोड यांनी विचारणा केली की,मागील इतिवृत्ताचे अनुपालनाचे वाचन करा व जे बँकेचे सभासद सेवानिवृत्त झाले त्यांना सभासद म्हणून का ठेवण्यात आले प्राधिकरणाचे दि.१०/०२/२०२३ चे पत्रान्वयें सभासद ठेवता येत नाही तसेच ज्या सभासदांचे शेअर्स ठेवले त्यांना लांभांश देणार काय तसेच सन्मा.सभासद श्री.काकडे यांनी सेवानिवृत्त सभासदांबाबत धोरण काय अशी विचारणा केली यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की,रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार ज्यांची रक्कम सात दिवस बँकेत राहीली त्यांना व्याज द्यावेच लागते त्यामुळे जे सभासद सेवानिवृत्त झाले त्यांची रक्कम बँकेच्या व्यवहारात असल्यामुळे त्यांना लाभांश द्यावा लागेल.प्रत्येक महिण्याच्या संचालक मंडळ सभेला सभासदांचे आलेल्या अर्जाची मंजुरी घेवून शेअर्स परत देण्यात आले काही सभासद

जमानतदार असल्याकारणाने जमानत बदली प्रक्रिया चालू असल्यामुळे ते प्रलंबित आहे.तरी यावर संचालक मंडळ सभेत विषय घेवून शेअर्स परत करण्याचा निर्णय घेण्यात येईल.तसेच सभागृहाने बँकेचे कार्यक्षेत्र वाढ झाल्यामुळे जिल्हा परिषदेचे कर्मचारी घेणार की , बाहेरचे सभासद करणार यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की ,सध्या जि.प.चेच कर्मचारी सभासद करून घेणार त्यावर सन्मा.सभासद श्री.राठोड यांनी आष्टीमध्ये शाखा उघडता येईल यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की,आष्टीमध्ये शाखा कशी उघडता येईल यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की,आष्टी लगतचे तालुके जसे काटोल ,वरूड , मोर्शी येथील सभासद करून आष्टी शाखेची १००० सभासदाची अट पूर्ण करता येईल हयावर सभागृहात साधक बाधक चर्चा होवून सर्वसमंतीने मागील वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक १७/०९/२०२३ चे इतिवृत्तास मंजुरी प्रदान करून इतिवृत्त कायम केले.

**ठराव–** वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १७/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्रमांक २) बँकेच्या ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा अहवाल,ताळेबंद पत्रक,नफातोटा पत्रकास मंजुरी देणे.**

विषयांकित प्रकरणी अध्यक्षांनी विषद केले की सहकार वर्षाचा ५८ वा अहवालासह ताळेबंद पत्रक ,नफातोटा पत्रक अहवाला पुस्तीकेत पान क्र. १९ ते २५ वर आर.बी.आय.च्या निर्देशानूसार सर्व हेडस इंग्रजीमध्ये नमुद केलेले आहे यामध्ये पान क्रमांक १४ वर अनुक्रमांक १ ते १५ हेड अंतर्गत बँकेची वित्तीय स्थिती दर्शविली आहे.सद्यास्थितीत सुरू असलेली कर्ज धोरण व कर्ज मर्यादा भगिरथ नियमित कर्ज १५ लाख पर्यंत व्याज दर ११ टक्के परत फेड कालावधी १४४ महिने ,कर्ज १५०१००० लाख ते २० लाख पर्यंत व्याज दर १२ टक्के परत फेड कालावधी १४४ महिने ,आकस्मिक कर्ज मर्यादा ७ लाख परत फेड कालावधी ६० महिने व्याज दर ११ टक्के ,गृह कर्ज योजना ४० लाख परत फेड कालावधी २० वर्षे ,सर्व कपाती वजा जाता मिळणारे वेतनाचे रक्कमेवर येणाऱ्या घरबांधनी कर्जाचा हप्ता यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढ्या रक्कमेची कर्ज मंजूर इत्यादीचा समावेश असून बँकेनी भविष्यातील कामकाजाची दिशा निश्चित केली असल्याची माहिती सभागृहात विशद केली तसेच सहकार वर्षाच्या ५८ व्या अहवालास मंजुरी प्रदान करण्याची सभागृहास विनंती केली.

तरी या विषयाच्या अनुषंगाने अध्यक्षांनी पान क्रमांक १९ वर ताळेबंद पत्रक व पान क्रमांक २० वर नफातोटा पत्रक असल्याचे सांगितले यावर काही सुचना असल्यास सुचवाव्या अशी विनंती केली.

तसेच अध्यक्षांनी सन २०२३–२०२४ या आर्थिक वर्षात बँकेला १८४.१५ लाख नफा झाला असल्याचे सांगितले.

वरील प्रमाणे विषय क्रमांक २ च्या अनुषंगाने प्रत्येक मुद्दयावर सविस्तर माहिती सभागृहास देण्यात आली.चर्चेअंती अध्यक्षांनी बँकेच्या दिनांक ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा ५८ वा अहवाल ,ताळेबंद पत्रक ,नफातोटा पत्रकास सभागृहाने मंजुरी प्रदान करावी अशी विनंती करून प्रस्ताव सभागृहाचे मंजुरीस सादर केला व सभागृहाने खालील प्रमाणे ठराव पारित करून मंजुरी प्रदान केली.

**ठराव :– बँकेच्या ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा अहवाल,ताळेबंद पत्रक , नफातोटा पत्रकास तसेच मुद्देनिहाय खुलासे व केलेल्या विविध तरतुदी व कार्यवाहीस ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्रमांक ३:–बँकेच्या सन २०२३–२४ सालाच्या मंजुर अर्थसंकल्पापेक्षा प्रत्यक्षात जास्तीच्या झालेल्या खर्चास संमती देणे व सन २०२४–२५ सालाच्या अर्थसंकल्पास मंजुरी देणे.**

विषयांकित प्रकरणी अध्यक्षांनी सभागृहास अवगत करूण दिले की विषय क्रमांक ३ हा अहवाल पुस्तीकेच्या पान क्रमांक २६–२७ वर आहे , तरी सदर विषय हा चर्चेकरीता अध्यक्षांनी सभागृहात ठेवला व अर्थसंकल्पनातील जास्तीच्या झालेल्या खर्चासंबंधी अ.क्र.६,१५,१६,२०,३६,४२,४७,४९ या हेडवर जास्तीचा झालेला खर्च दिसुन येतो ,जसे अ.क्र.०६ संचालक सभा प्रवास खर्च रू.३,४२,५०८/–महाराष्ट्र शासन राजपत्र दि.६ जुलै २०२३ नूसार संचालकांचे बैठक भत्ता व मिटींग भत्यात वाढ झाल्यामुळे अ.क्र.१५ संगणक डाटा सेंटर घसारा रू.२९५२६८/–या आर्थीक वर्षात संगणक प्रिन्टर खरेदी केल्यामुळे घसारामध्ये वाढ झाली.अ.क्र.१६ वर

कर्मचारी मेडिक्लेम विमा रू.७६,१५५/–या आर्थिक वर्षामध्ये कर्मचाऱ्यांचा मेडिक्लेम विमा काढल्यामुळे वाढ झाली.अ.क्र.२० वीज खर्च रू.५१,२५०/–या आर्थिक वर्षामध्ये विजेच्या दरात वाढ झाल्यामुळे खर्चामध्ये वाढ झाली.अ.क्र ३६ एन.पी.ए.कर्ज तरतुद रू.१,५८,२७,०००/– या आर्थिक वर्षामध्ये एन.पी.ए.खात्यात वाढ झाल्यामुळे खर्चामध्ये वाढ झाली. अ.क्र.४२ ट्रेनिंग खर्च रू.१,२४,६०८/–बँकेला दमन व मुंबई येथे पुरस्कार घेण्याकरीता व कार्यशाळेला उपस्थित राहण्याबाबतचा खर्च अ.क्र.४७ आर.आर.सी.खर्च रू.२७७८.८०/–एन.पी.ए.खात्याला चार्ज लागल्याबाबतचा खर्च अ.क्र.४९ जीएसटी खर्च रू.३,७५,५६७.५४ या आर्थिक वर्षात जी.एस.टी.शासनाला भरल्याबाबत म्हणून जास्तीचा खर्च झालेला दिसतो.परंतु प्रत्यक्षात जास्तीचा खर्च झालेला नाही.असे स्पष्ट केले तर काही हेडवरील जास्तीच्या खर्चासंबंधी झालेला खर्च हा वैधानिक स्वरूपाचा असतो व तो करावाचा लागतो.त्यामुळे जास्तीचा खर्च दिसून येतो.त्यामुळे मागील तरतुदीपेक्षा तो जास्तीचा झाल्याचे दिसून येते मात्र इतर खर्च हा मर्यादेचे आतच असल्याचे सभागृहास सांगितले तरी यास आपण मंजुरी प्रदान करावी असे सांगितले.यावर सन्मा.सभासद श्री.वऱ्हाडे यांनी आमसभेच्या खर्चाबाबत विचारणा केली व इतिवृत्ता नुसार ३,१३,६००/–चा खर्च झालेला असतांना अहवालामध्ये ३,४४,१९०/–कसा दाखविला ? यावर सन्मा.सभासद श्री.राठोड यांनी उर्वरित खर्च आमसभेच्या हेडखाली का करण्यात आला ? तर सन्मा.सभासद श्री.काकडे यांनी आमसभेच्या खर्चात तफावत का ? खर्चात अनियमितता झाली आहे याचे उत्तर द्यावे अशी मागणी केली.त्यामुळे आम्हाला हा खर्च मान्य नसल्यामुळे हा विषय नामंजुर आहे यावर मुकाअ यांनी आमसभेच्या खर्चाची माहिती दिली.ती याप्रमाणे दि.२७/८/२०२३ ला मातोश्री हॉलला अग्रीम रूपये ५०००/– व वृत्तपत्रात जाहीरात १०००/– असे एकुण ६०००/– व दि.२२/१०/२३ ला रूपये ३,१३,६००/–चा आमसभेचा खर्च व दि.३०/०३/२०२४ ला विशेष आमसभेचा खर्च रू.२४५९०/– असा झालेला आहे.सदर विशेष आमसभा दोन विषयासंबंधी घेण्याचे ठरविले होते परंतु काही कारणांमुळे सदर विशेष आमसभा रद्द करण्यात आली .उपरोक्त देण्यात आलेला ॲडव्हांस आर्थिक वर्षात बँकेत परत घेण्यात आलेला आहे.त्यामुळे सदर विषयाला मंजुरी द्यावी अशी विनंती मा.अध्यक्षांनी सभागृहाला केली.

वरील चर्चेअंती अध्यक्षांनी जास्तीच्या झालेल्या खर्चाबाबत सविस्तर चर्चा करून सभागृहास सांगितले आणि मागील वर्षातील अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा अनु.क्र.६,१५,१६,२०,३६,४२,४७,४९ या बाबींवर जादा खर्चाची माहिती सभागृहात सादर केली असता सभागृहानी सदर बाबींवर जास्तीच्या झालेल्या खर्चास सभागृहास आवाजी मताने या मुद्द्यावर मंजुरी प्रदान केली व वरील विषय क्र.३ संबंधाने खालील प्रमाणे ठराव आवाजी मताने पारित केला.

**ठराव :–बँकेच्या सन २०२३–२४ सालाच्या मंजुर अर्थ संकल्पापेक्षा प्रत्यक्षात वर नमुद मुद्यावर जास्तीच्या झालेल्या खर्चास तसेच सन २०२४–२५ सालाच्या अर्थ संकल्पास ही सभा आवाजी मताने मंजूरी प्रदान करीत आहे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ४:–बँकेच्या संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२३–२४ चे निव्वळ नफ्याचे वाटणीपत्रकास मंजुरी देणे.**

मा.अध्यक्षांनी विषय क्रमांक ४ नफावाटणी पत्रक हे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० व बँकेच्या उपविधीतील कलम ५४ नुसार संचालक मंडळाने नफ ावाटणी पत्रक तयार केले आहे.व सदर विषय हा अहवाल पुस्तिकेच्या पान क्रमांक २८ वर असल्याचे सभागृहास सांगितले असेही स्पष्ट केले की बँकेनी तरतुदी परिपूर्ण करण्यावर भर दिला व आपले यास सहकार्य लाभले त्यामुळे तरतुदी पुर्ण झाल्यावरून बँक सक्षम झाली व बँकेनी ठेवी संबंधी व्याजापोटी करावयाच्या तरतुदी १०० टक्के झाली आहे तरी यावर्षी सन ३१/०३/२०२४ चे भागभांडवलावर संचालक मंडळाने १२ टक्के लाभांष वाटपास मंजुरी देण्याची आपना समोर शिफारस केली आहे. नफा वाटणीचे अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० नुसार नफ्यातून नफा वाटणीची तरतुद करणे बंधनकारक असल्यावरून बँकेनी त्या प्रमाणे नफा वाटणी केलेली आहे.तसेच वरील निर्णयानुसार बँकेनी १२टक्के दरानुसार सभासदांना लाभांष वितरीत करण्यास आपण मंजुरी प्रदान करावी अशी विनंती केली.परंतु विषय क्र.२ अन्वयें सभागृहाचे विनंतीला मान देवून या आर्थिक वर्षाचा लाभांश १४ टक्के देण्याचे मान्य केले आहे.

मा.अध्यक्षांनी सभागृहास अवगत करून दिले की.सन २०२३–२४ ह्या वर्षाचे अंकेक्षण झालेले असून त्यासंबंधी अंकेक्षण अहवाल सुध्दा प्राप्त झाला आहे व बँकेस ऑडीट अ प्राप्त झाला .सभासदांना विनंती करण्यात येते ,ज्या सभासदांची कर्ज खाते एन.पी.ए.मध्ये आहे अशा प्रकरणी लाभांश वाटप न करता तो त्यांच्या कर्ज खात्याला वळती करण्यात येईल.तरी सन्मा.सभासदांनी यास मान्यता द्यावी अशी विनंती केली असता खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

## नफावाटणी पत्रक सन २०२३-२४

| अ. क्र. | नफा | रूपये/पैसे | अ. क्र. | नफावाटनी पत्रक | टक्के | रूपये/पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मागील शिल्लक नफा सन २०२२-२०२३ | 0.00 | १ | रिझर्व्ह फंड | २५% | ४६०३८३९.00 |
| २ | सन २०२३-२०२४ चा एकुण नफा | १८४१५३५५.६२ | २ | लाभांष शेअर्स रू.१०३१६५५१५ वर | १२% | १२८०१०९५.६२ 0.00 |
| | | | ३ | निवडणुक निधी | (१/५)१ | ९०६००.00 |
| | | | ४ | शैक्षणिक निधी | ५ % | ४५९९१.00 |
| | | | ५ | तंत्रज्ञान विकास निधी | ५ % | ४३६९२.00 |
| | | | ६ | इमारत निधी | | ३३१४.00 |
| | | | ७ | शाखा बांधकाम सेलु | (१०/६) | १३६७००.00 |
| | | | ८ | शाखा आर्वी बांधकाम | (१०/६) | २५४१००.00 |
| | | | ९ | शाखा समुद्रपूर गाळा खरेदी | (१०/२) | ४३६०२४.00 |
| | एकुण नफा | १८४१५३५५.६२ | | एकुण बेरीज | | १८४१५३५५.६२ |

**ठराव :- विषय क्रमांक ४ च्या अनुषंगाने सभागृहासमक्ष ठेवलेला वर नमुद प्रस्ताव पाहता व मा.सभागृहाचे विनंतीवरून १४ टक्के लाभांष वाटपास सन २०२३-२४ चे नफा वाटणी पत्रकास ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्रमांक ५- बँकेच्या सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता सनदी लेखापालाने केलेल्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेवुन बँकेनी केलेल्या दोषदुरूस्ती अहवालास मंजुरी देणे.**

मा.अध्यक्षांनी विषय क्रमांक ५ च्या संबंधाने माहीती विषद करतांना स्पष्ट केले की सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करून घेण्यासंबंधाने मा.सहकार आयुक्त तथा निबंधक याचे आदेशान्वये सहकारी संस्थांना अंकेक्षकाची निवड करणे संबंधी दिलेल्या स्वायत्तते नुसार बँकेनी मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१७/९/२०२३ विषय क्रमांक ५ अन्वयें मे.सी.ए.पी.ॲन्ड कंपनी चैतन्य इंगळे अमरावती  चाटर्ड अकॉउंटंट अमरावती यांची सन २०२३-२०२४ करीता अंकेक्षक म्हणुन मंजुरी दिली असुन त्यानुसार त्यांनी बँकेचे अंकेक्षण केलेले असुन अंकेक्षण प्रमाण पत्र बँकेस दिलेले आहे व बँकेस ऑडिट वर्ग ''**अ**'' प्राप्त झाला आहे, लेखापरिक्षण अहवालातील निघालेले दोष व त्यावरील दोषाची पुर्तता संबंधी दुरुस्तीचे वाचन सभागृहात करण्यात आले.व यावर सभागृहात साधक बाधक चर्चा होवून अध्यक्षांनी वरील विषयास आपण मंजुरी प्रदान करावी अशी विनंती केली असता सभागृहाने यास स्विकृती दिली व खालील प्रमाणे ठराव पारित करून सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव- विषय क्र.५ अनुषंगाने सन २०२३-२४ चे लेखापरिक्षण अहवाल व दोष दुरूस्ती अहवालाचे सभागृहात वाचन केल्यावरून ही सभा सदर अहवालास व त्या अनुषंगाने अनुपालनास सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे. ठराव सर्वानुमते मंजुर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्रमांक ६-बँकेचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता संचालक मंडळाने शिफारस केल्यावरून आर.बी.आय.चे निर्देशानुसार वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक होत असल्यावरून त्यास अधिन राहुन आपले अनुसमर्थन देणेबाबत.**

विषयांकित प्रकरणी मा.अध्यक्षांनी सभागृहास अवगत करून दिले की यापूर्वी ऑडिटरची नेमणूक करण्याकरीता संचालक मंडळ शिफारस करून आमसभेच्या मंजुरीवरून ऑडिटरची नेमणूक करण्यात येत होती.परंतु रिझर्व्ह बँकेचे दिनांक २७ एप्रिल २०२१ चे परिपत्रकावरून वैधानिक लेखापरिक्षकाची निवड करण्याचे अधिकार रिझर्व्ह बँकेला आहे.त्यानुसार संचालक मंडळ सभा दिनांक २७/०६/२०२४ चे सभेतील ठराव क्रमांक १३ अन्वयें संचालक मंडळानी सर्व कार्यवाही अंती मे.संजय चिंडालिया ॲन्ड कंपनी नागपूर यांच्या नावांची शिफारस करून रिझर्व्ह बँकेला मंजुरीकरीता पाठविले आहे.करीता सदर विषयाला आपले अनुसर्मथन द्यावे अशी सभागृहास विनंती केली.

यावर सभागृहात विचार विनिमय होवून सन २०२४-२५ या वर्षाचे वैधानिक ऑडीट संबंधाने ऑडीटरचे नेमणुकीसंबंधाने बँकेनी वरील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस अनुसमर्थन दिले व सहाकरी कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचा मेहनताना देण्यास सुध्दा मंजुरी प्रदान केली.

**ठराव :-बँकेच्या सन २०२४-२५ या वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करण्याकरीता बँकेनी वरील प्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीस व त्या अनुषंगाने लेखापरिक्षकाची नेमणुक करण्यास सभागृहाने आपले अनुसमर्थन दिले तसेच त्यांच्या मेहनताना हा सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार देण्यास सुध्दा मंजुरी प्रदान केली.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ७:- रिझर्व्ह बँकेच्या आक्षेपानुसार बँकेच्या उपविधी क्रमांक ३९,५५,६१(सी)मध्ये दुरूस्ती घेण्यास मंजुरी देणे.**

अध्यक्षांनी विषयाच्यसा अनुषंगाने सभागृहास अवगत करूण दिले की बँकेच्या उपविधी क्रमांक ३९,५५,६१(सी)मध्ये बँकेचे उपविधीत दुरूस्ती घ्यायची आहे ती खालीलप्रमाणे .

| पोटनियमातील क्र. | सध्याचे पोटनियमाची शब्द रचना | दुरूस्ती करावयाची पोटनियमाची शब्द रचना | दुरूस्तीनंतर होणाऱ्या पोटनियमाची शब्द रचना | पोटनियम दुरूस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|
| ३९ | **ELIGIBILITY OF BOARD OF DIRECTORS**<br>To contest the election of board of directors the active member should comply following model criteria depending upon the size of the bank.Sr.No. Bank category model shares amt Deposit.<br>Sr.No. Bank Category Models of shares Amt.Model Amo.Deposit<br>1 Upto 100 Cr. 5000 and 25000<br>2. 100 to 500 Cr. 10000 and 50000<br>3. More than 500 Cr. 15000 and 100000 | **ELIGIBILITY OF BOARD OF DIRECTORS.**<br>Those contesting for directorship in urban banks should have been members for a minimum period of two years similarly.members contesting for election to the Board should have had a minimum deposit of any type of Rs.500 in the urban bank concerned for a minimum period of two years continuously. | **ELIGIBILITY OF BOARD OF DIRECTORS.**<br>Those contesting for directorship in urban banks should have been members for a minimum period of two years similarly . members contesting for election to the board should have had a minimum deposit of any type of Rs.500 inthe urban bank concerned for a minimum period of two years continuously. | भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तपासणीमध्ये आक्षेपाची पुर्तता करण्याबाबत. |
| ५५ | **LINKING OF SHARE HOLDING WITH LOAN LIMIT**<br>a) 7.5% of the borrowing of such borrowings are unsecured basis. | **LINKING OF SHARE HOLDING WITH LOAN LIMIT**<br>a) 5% of the borrowings .If the borrowings are on unsecured basis. | **LINKING OF SHARE HOLDING WITH LOAN LIMIT.**<br>a) 5% of the borrowings .If the borrowings are on unsecured basis. | भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तपासणीमध्ये आक्षेपाची पुर्तता करण्याबाबत. |
| ६१ | **AMENDMENT TO BYE-LAWS**<br>C) Any addition amendmen t,alternation or rescission resolved upon at such meeting shall take effect from the date of receipt of the Registrar's approval in writing. | C) Any addition amendment alternation or rescission resolved upon at such meeting shall take effect from the date of receipt of the NOC of Reserve bank of india and Registrar's approval in writing. | C) Any addition amendment alternation or rescission resolved upon at such meeting shall take effect from the date of receipt of the NOC of Reserve bank of india and Registrar's approval in writing. | भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तपासणीमध्ये आक्षेपाची पुर्तता करण्याबाबत. |

बँकेचे भारतीय रिझर्व्ह बँकेचे पत्र क्र. S713 दि.३१/०८/२०२३ नुसार भारतीय रिझर्व्ह बँकेचे तपासणी अधिकारी श्री.निरज पाटील यांचे व्दारे दि.११/०९/२०२३ पासुन तपासणी झाली असून तपासणी अहवाल बँकेस प्राप्त झाला असून तपासणी अहवालातील पान क्र.७ वर वरील प्रमाणे उपविधीत दुरूस्ती घेण्याबाबत आक्षेप घेतला आहे.आक्षेपाची पुर्तता करण्याकरीता सदर विषय मंजुरीस ठेवलेला आहे तरी यास मंजुरी द्यावी अशी विनंती मा.अध्यक्ष साहेबांनी केली.

यावर सभागृहात चर्चा होवून वरील उपविधी दुरूस्तीला सभागृहाने सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.सदर प्रस्ताव मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे व मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांचेकडे पाठविण्यास सुध्दा मंजुरी प्रदान केली.

सुचकः श्री.चंद्रशेखर लाजुरकर

अनुमोदक : श्री.विनोद महाजन

**ठराव :- वरील चर्चेवरून उपविधी क्रमांक ३९,५५,६१(सी)मध्ये दुरूस्ती घेण्याबाबत सभागृहानी सर्वानुमते मंजुरी प्रदान केली तसेच सदर प्रस्ताव मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे व मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांचेकडे पाठविण्यास सुध्दा मंजुरी प्रदान केली.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ८ः– बँकेच्या कर्जदार सभासदास घेत असलेल्या दोन जमानतदाराऐवजी एक जमानतदार घेण्यास मंजुरी देणे.**

अध्यक्षांनी विषयाच्या अनुषंगाने सभागृहास अवगत करून दिले की,बँकेच्या सभासदांना कर्ज घेतेवेळीस दोन जमानतदार द्यावे लागतात.परंतु सभासद संख्या कमी होत आहे तसेच बँकेनी सगळ्या कर्जाची वसुली ईसीएस मार्फत करीत असल्यामुळे एक जमानतदार घेतला तरी हरकत नसल्याचे संचालक मंडळ सभेमध्ये ठरविण्यात आले .तरी विषय मंजुरीस ठेवलेला आहे तरी यास मंजुरी द्यावी अशी विनंती मा.अध्यक्ष साहेबांनी केली.यावर सभागृहात साधक बाधक चर्चा होवून सभागृहाने सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठरावः– विषयांकीत प्रकरणी झालेल्या चर्चेवरून बँकेच्या सभासदांना कर्ज घेतेवेळीस दोन जमानतदार द्यावे लागतात परंतु सभासद सेवानिवृत्त होत असल्यामुळे सभासद संख्या कमी होत आहे तसेच बँकेनी सगळ्या कर्जाची वसुली ईसीएस मार्फत करीत असल्यामुळे कर्जास एक जमानतदार करण्यास सभागृहाने सर्वानूमते मंजूरी प्रदान केली.ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्रमांक ०९ः– वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थीस क्षमापित करणे.**

विषयांकीत प्रकरणी अध्यक्षांनी सभागृहास अवगत करून दिले की,आजच्या सर्व साधारण सभेला जे सभासद उपस्थित नाही त्यांची अनुपस्थिती क्षमापित करण्याबाबत आपले मंजुरीस प्रस्तावित आहे.यावर सभागृहात साधक बाधक चर्चा होवून सभागृहाने सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव :– विषयांकीत प्रकरणी सभागृहात साधक बाधक चर्चा होऊन वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेले सभासदांची अनुपस्थितीस क्षमापित करण्यास सभागृहाने सर्वानुमते मंजुरी प्रदान केली ,ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्रमांक १०ः– मा.अध्यक्ष साहेबांचे अनुमतीने वेळेवर येणारे अन्य विषय .**

या अनुषंगाने अध्यक्षांनी स्पष्ट केले की बँकेनी अहवाल पुस्तीकेवरील आधारीत प्रश्न दिनांक १२/०९/२०२४ पावेतो लेखी स्वरूपात सादर करण्याची विनंती केली होती.सदर कालावधीच्या आत फ क्त सन्मा.सभासद श्री.नरेश भा.वानकर,श्री.सुदेश कृ.खोब्रागडे,श्री.रविंद्र दे.राठोड,श्री.लोमेश अ.वऱ्हाडे व श्री.आशिष रा.फरकाडे यांचे कडून प्रश्न प्राप्त झालेले आहेत.

**सन्मा.सभासद श्री.नरेश वानकर**

**प्रश्न क्र.१ :– समुद्रपूर येथे बँकेच्या प्लॉट असून त्याचे विकण्याबाबत काय झाले याबाबत माहिती सर्व सभासदांना अवगत करावी.**

उत्तर :–शाखा समुद्रपूर येथील प्लॉट विकण्याला सर्व साधारण सभा दि.१७/०९/२०२३ विषय क्र.८ अन्वयें मंजूरी प्राप्त झाल्यानंतर बँकेनी मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धाकडे दि.२३/१०/२०२३ व दि.०२/०५/२०२४ ला प्रस्ताव दिला असता त्यांचेकडून जा.क्र.३७९३ दि.३१/०७/२०२४ ला पत्र प्राप्त झाले त्यात त्यांनी सदर बँक राज्यस्तरीय झाल्यामुळे प्लॉट विकण्याची परवानगी मा.सहकार आयुक्त पुणे यांना मागावी असे पत्र दिले त्यानुसार बँकेनी जा.क्र.१२६ दि.०६/०८/२०२४ ला मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांना प्रस्ताव पाठविला त्यांची मंजूरी प्राप्त होताच कार्यवाही करण्यात येईल.

**प्रश्न क्र.२ः–सन २०२२–२३ मध्ये नफा २०७.९९ होता सन २०२३–२४ हा घटून १८४.१५ झाला यात घट झाली याचे कारण काय ?**

उत्तरः– या आर्थिक वर्षात मा.रिझर्व्हे बँकेकडून आपल्या बँकेची तपासणी झाली असून त्यामध्ये सभासदांचे एक खात एनपीए मध्ये गेल्यास उर्वरित खातेसुध्दा एनपीए मध्ये घेण्याचे सुचविले त्यामुळे बरेच कर्जखाते एनपीए मध्ये घ्यावे लागले.त्यामुळे सदर कर्जावरील व्याज नफ्यामध्ये घेता येत नसल्यामुळे नफ्यामध्ये घट झाली.

**प्रश्न क्र.३ः– सन २०२२–२३ मध्ये १४ टक्के मग सन २०२३–२४ मध्ये १२ टक्के प्रस्तावित आहे काय ?खुलासा करावा.**

उत्तर – या प्रश्नाचे उत्तर वरील प्रश्न क्र.२ चे उत्तरामध्येच आहे.

**प्रश्न क्र.४ :– थकीत प्रकरणे १८६ आहे याबाबत यादीस सर्व सभासदांना अवगत करावे.**

उत्तर :– अहवाल मध्ये दिलेली थकीत प्रकरणे १८६ असून यापैकी फक्त ११३ सभासदांकडे थकित कर्ज असून एकाच सभासदाकडे दोन किंवा तिन प्रकारचे कर्ज असल्यामुळे सभासद संख्येत वाढ दिसत आहे.गोपनियतेच्या दृष्टीने सभासदांची वैयक्तिक माहिती आमसभेत देणे योग्य होणार नाही.सदर यादी उपलब्ध असून मुख्यालयात येवून पाहता येईल.

**प्रश्न क्र.५ः–नाममात्र सभासद संख्या मागील वर्षाच्या तुलनेत जास्त दिसते याबाबत त्यांचे नावासह यादी अवगत करावी.**

उत्तरः बँक जिल्हा परिषद अंतर्गत कत्रांटी नाममात्र सभासदांना कर्ज वाटप करीत असल्यामुळे नाममात्र सभासद संख्येत वाढ झाली.सदर यादी उपलब्ध असून मुख्यालयात येवून पाहता येईल.

**प्रश्न क्र.६ :–मृत कर्मचारी यांचे व्याज माफ करण्यात येते मग मृत्यु पावलेल्या सभासदांचा इंश्युरन्स काढला जातो तर मग व्याजाचा आणि कर्ज इंश्युरन्स मध्ये नसते काय ?याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.**

उत्तरः– बँकेत सभासदाचा फक्त अपघात विमा असतो नैसर्गिक विमा लागू नाही .त्यामुळे बँकेचे सभासदाप्रति दायीत्व म्हणून सभासदांचे मृत्यु पश्चात व्याज माफ केल्या जाते.

**प्रश्न क्र.७ :–एनपीए तरतुद २०,०० लाख असतांना खर्च १७८.२७ केलेला दिसून येते यामध्ये एनपीए खातेदाराचे नावासह सर्व सभासदांन अवगत करावे.**

उत्तरः–बँक एनपीए मार्क करतांना सभासदांचे एकच कर्ज खाते गृहित धरल्या जात होते परंतु मा.रिझर्व्ह बँकेच्या तपासणीमध्ये एका सभासदाचे तीन कर्जखाते असल्यास तिनही खाते एनपीए मध्ये धरल्यामुळे एनपीए खात्यात वाढ झाली.त्यामुळे एनपीए तरतुद खर्चामध्ये वाढ झाली.

**प्रश्न क्र.८ः–संचालक मंडळ प्रवास खर्च २ लक्ष तरतुद खर्च ५.४२ लक्ष याबाबत सदर खर्चाची सविस्तर माहिती देण्यात यावी.**

उत्तरः–महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०५ जुलै २०२३ च्या परिपत्रकाप्रमाणे दैनिक भत्ता व बैठक भत्यामध्ये वाढ झाल्यामुळे तसेच संचालक मंडळ संख्येत वाढ झाल्यामुळे खर्चात वाढ झाली आहे.

**२)श्री.रविंद्र देविदास राठोड सभासद**

**प्रश्न क्र.१ः– बँकेची आर्थिक स्थिती चांगली असतांना २ टक्यांनी लाभांश का कमी करण्यात आला ?**

उत्तर ः– मा.रिझर्व्ह बँकेच्या तपासणीमध्ये एनपीए खात्याची वाढ झाली त्यामुळे एनपीए तरतुदीमध्ये रू.६ कोटी ७ लाखानी तरतुद वाढविण्यात आली.त्यामुळे लाभांश कमी करण्यात आला.

**प्रश्न क्र.२ ः– लाभांश २ टक्यांनी कमी करण्यात आला तर इतर खर्च जास्त का करण्यात आला ? सविस्तर उत्तर द्यावे.**

उत्तर ः– सन २०२२–२३ मध्ये इतर खर्च रू.१,३७,४३,२५८ होता व २३–२४ मध्ये इतर खर्च ६४,७५,३८२ इतका आहे त्या तुलनेत इतर खर्च कमी आहे या आर्थिक वर्षात रू.७२६७८७६/–मागील आर्थिक वर्षातील खर्चा पेक्षा कमी झालेला आहे.

**प्रश्न क्र.३ः– मागील वर्षात बँकेचा एनपीए १.०९ टक्के एवढा होता.तो वाढून १.८५ टक्के झाला.एनपीए वाढण्याची कारणे कोणती ?एनपीए कमी करण्यासाठी संचालक मंडळाने कोणत्या उपाययोजना केल्या ?**

उत्तर ः– मा.रिझर्व्ह बँकेनी माहे संप्टेंबर २०२३ ला तपासणी झाली.तपासणीपूर्वी फक्त सभासदांचे एकच खाते धरण्यात येत होते.रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानूसार सभासदांचे एक खाते जरी एनपीएत गेले तरी उर्वरीत सर्व खाते एनपीएमध्ये धरण्यात येतात.म्हणून एनपीए खात्याची वाढ झाली त्यामुळे एनपीए तरतुदीमध्ये रू.६ कोटी ७ लाखांनी तरतुद वाढविण्यात आली.तसेच बँकेनी वसुली मोहीत तीव्र केली असून एनपीए व ओव्हरडयु खातेदाराकडे बँकेचा कर्मचारी प्रत्यक्ष भेट घेवून वसूलीचा प्रयत्न करीत आहे.त्यानुसार १ कोटी ३ लाखाची वसूली प्राप्त झाली.तसेच कलम १०१ नुसार सात सभासदांवर कार्यवाही सुरू आहे.

**प्रश्न क्र.४ः– एनपीए मध्ये असलेल्या किती सभासदांना पुन्हा कर्ज वाटप करण्यात आले ?**

उत्तर ः –जो सभासद एनपीए मध्ये आहे त्याला पुन्हा कर्ज वाटप करण्यात आले नाही.परंतु एन.पी.ए.मधून सदर कर्ज निघण्याकरीता सभासदांचे विनंती वरून कर्जाचे पुर्नगठण करण्यात आलेले आहे.

**प्रश्न ५ ः– या वर्षीच्या अर्थसंकल्पात मृत्यू निधीची तरतुद दिसून येत नाही याची कारणे कोणती ?**

उत्तर ः मृत्यु निधी मध्ये ३१/०३/२०२४ ला रू.१५ लाख ९० हजार शिल्लक असल्यामुळे अर्थसंकल्पात तरतुद केलेली नाही.

**प्रश्न क्र.६ः– भगीरथ कर्ज१५ लाख पर्यंत घेतल्यास व्याजदर ११ टक्के तर त्यावर कर्ज घेणाऱ्याला १२ टक्के व्याजदर आकारण्यात येणार आहे.याला कर्ज घेण्यासाठी प्रलोभन समजावे की आडकाठी ? अशा धोरणामुळे किती टक्क्यांनी कर्ज वाटप वाढले ?**

उत्तर ः–ठेवीचे व्याजदर ८.४० टक्क्यावर गेल्यामुळे कर्जाचा व्याजदर वाढविणे आवश्यक होते.परंतु सभासदांचे हिताचा विचार करता १५ लाखापावेतो कर्जाला जुनाच व्याजदर कायम ठेवण्यात आला.ठेवीच्या व कर्जाच्या व्याजाचा समतोल साधण्याकरीता १५ लाखावरील व्याजदर १२ टक्के करण्यात आला.सदर कर्ज योजना ०१/०६/२०२४ पासून सुरू करण्यात आली असून ९ सभासदांना १ कोटी ७१ लाख रूपये कर्ज वितरीत करण्यात आले आहे.

**प्रश्न ७ः– डीसीपीएस धारकांसाठी सानुग्रह योजनेची अंमलबजावणी झाली का ?झाली असल्यास सविस्तर माहिती द्यावी ?**

उत्तर ःआमसभेची मंजुरी दिल्यानंतर बँकेनी मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांना मंजूरीकरीता प्रस्ताव पाठविला असता मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांचे पत्र क्र.२७४२ दि.१५/०५/२४ नुसार मंजूरी प्राप्त झाली असून दि.०१/०६/२०२४

पासून कार्यवाही सुरू झाली असून आज पावेतो अर्ज प्राप्त झाले आहे.

सदर योजना कार्यान्वीत करण्याकरीता किमान २०० सभासदांनी अर्ज आवश्यक असल्याचे संचालक मंडळांनी ठरविले असून त्याकरीता मी तुम्हाला आव्हान करतो की डीसीपीएस धारकांनी या योजनेत सहभागी व्हावे.

**प्रश्न क्र.८ः–विषय क्रमांक ८ नुसार दोन जमानतदार ऐवजी एक जमानतदार असावे याकरता मंजूरीस ठेवलेले आहे.त्याकरीता बँकेचे नियम काय ?**

उत्तर ः–बॅकेंच्या उपविधी क्र.५२ नुसार कर्जधोरण ठरविण्याचे अधिकार मा.संचालक मंडळाला आहे.बँकेनी कर्जवसुनी संबंधाने ईसीएस प्रणाली सुरू केल्यामुळे तसेच सभासद संख्यास कमी होत असल्यामुळे संचालक मंडळांनी एक जमानतदार ठेवण्यास हरकत नसल्याचे ठरविले दिर्घमुदतीच्यसा कर्जाकरीता दिर्घ काळ नोकरी असणारे सभासद जमानत घेणेकरीता मिळणे कठीण असल्यामुळे तसेच बँकेची सभासद संख्या कमी होत असल्याने सभासदांचे हिताकरीता सदर विषय घेण्यात आलेला आहे.

**३) श्री.सुदेश कृपाशंकर खोब्रागडे सभासद**

**प्रश्न क्र.१ ः– राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या दि.१०/०२/२०२३ च्या पत्रान्वयें सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बँकेचे सभासद राहता येत नाही तरी सुध्दा काही सेवानिवृत्त सदस्यांच सदस्यत्व कायम आहे त्यांची संख्या किती व त्यांचे नावे कोणती.**

उत्तर ः–सभासद संख्या ९२६ आहे.जे सभासद सेवानिवृत्त झाले त्यानी शेअर्सची मागणी केल्यानंतर त्यांनी शेअर्स परत करण्यात येत आहे.

**प्रश्न क्र.२ः– सेवानिवृत्त पण सदस्यत्व कायम सभासदांच्या शेअर्सवर डिव्हिंडंट देणार का?तसेच यांना मतदानाचा अधिकार व निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार संचालक मंडळ देणार का ?**

उत्तर ः–सेवानिवृत्त सभासदांचे जो पर्यंत भागभांडवल जमा आहे तो पर्यंत त्यांना लाभांश द्यावा लागेल.रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार ज्यांची रक्कम सात दिवस जरी बँकेत राहीली त्यांना व्याज द्यावेच लागते त्यामुळे जे सभासद सेवानिवृत्त झाले त्यांची रक्कम बँकेच्या व्यवहारात असल्यामुळे त्यांना लाभांश द्यावा लागेल.प्रत्येक महिण्याच्या संचालक मंडळ सभेला सभासदांचे आलेल्या अर्जाची मंजुरी घेवून शेअर्स परत देण्यात आले काही सभासद जमानतदार असल्याकारणाने जमानत बदली प्रक्रिया चालू असल्यामुळे ते प्रलंबित आहे तरी यावर संचालक मंडळ विषय घेवून शेअर्स परत करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

**प्रश्न क्र.३ः– सन २०२२–२३ च्या आमसभेला प्रत्यक्ष किती खर्च झाला व कोणत्या संचालक मंडळ सभेत किती खर्चाला मंजूरी दिल्या गेली ?**

उत्तर ः– सन २२–२३ च्या आमसभेला रू.३४४१९०/–चा खर्च झालेला असून संचालक मंडळ सभा दि.२७/०८/२०२३ ला मातोश्री हॉलला अग्रीम रू.५०००/–व वृत्तपत्रात जाहीरात रू.१०००/– असे एकुण ६०००/– व दि.२२/१०/२०२३ ला रू.३१३६००/– चा आमसभेचा खर्च दि.३०/०३/२०२४ ला विशेष आमसभेचा खर्च रू.२४५९०/– तरी हा खर्च पुढिल आर्थिक वर्षात परत घेण्यात आला.

**प्रश्न क्र.४ ः–कर्मचारी मेडीक्लेम वर ७६१५६/–रू जास्तीचा खर्च दिसून येतो त्याला आमसभेची मंजूरी घेतली होती का ?**

उत्तर ः– बँकेचे कर्मचारी यांना मेडीक्लेम देण्याबाबत संचालक मंडळ सभेत निर्णय झाला असून यात कर्मचाऱ्याची अर्धी रक्कम व बँकेकडून अर्धी रक्कम देवून मेडीक्लेम काढण्यात आला.सदर हेड नविन असल्यामुळे जास्तीचा खर्च दिसून येतो.कर्मचाऱ्यांना कुठल्याही प्रकारचे प्रतिपूर्ती देयक मिळत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हिताचे दृष्टीने सदर निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.

**प्रश्न क्र.५ः–बँके प्रशिक्षणावर १२४६०८/– रू.खर्च झालेला आहे .हे ट्रेंनिंग कोठे व केव्हा झाले.**

उत्तर ः– बँकेला बँकोतर्फे पुरस्कार प्राप्त झाला त्या अनुषंगाने दमन येथे ०३/०१/२०२३ ला प्रशिक्षण आयोजित केलेले होते तसेच फेडरेशन मुंबई येथे बँकेला पुरस्कार प्राप्त झाला त्या अनुषंगाने तेथेही दि.२९/०९/२०२३ ला प्रशिक्षण आयोजित केलेले होते त्या संबंधाने खर्च झालेला आहे.

**प्रश्न क्र.६ः– बँकेत तज्ञ संचालक नेमण्याची तरतुद आहे .त्यावर काय कार्यवाही करण्यात आली?**

उत्तर ः–आपली बँक पगारदार सेवकांची बँक असल्यामुळे तज्ञ संचालक नेमण्याची तरतुद नाही उपविधी क्र.४९ अन्वयें .तसेच रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकात नमुद आहे.परिपत्रक बँकेत उपलब्ध आहे

**४)श्री.लोमेश वऱ्हाडे व श्री.आशिष रामभाऊ फरकाडे , सभासद**

**प्रश्न क्र.१ः– आपले बँकेत नविन मु.का.अ.ची नियुक्ती करण्यात आली त्याला कोणकोणत्या सहकार कार्यालयाची ,संचालक मंडळ आणि आमसभेची परवानगी घेण्यात आली.**

उत्तरः–बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी हे पद रिझर्व्ह बँकेच्या अधिपत्याखाली येत असल्याने रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक क्र.२०२१–२२/६०/आरईसी–२५/१२.१०.०००/जुन २५,२०२१ मधील अनु.२.१,३.४सी,३,४,३ नुसार संचालक मंडळ सभा दि.२८/०४/२०२४ ठराव क्र.१७ अन्वयें नेमणुक करण्यात आली याबाबत फेडरेशन ला विचारणा करण्यात आली असता त्याचे पत्र क्र.८४० दि.२३/०१/२०२३ चे पत्रान्वयें हे पद रिझर्व्ह बँकेच्या अधिकारात येत असल्यामुळे सहकार कार्यालयाची व आमसभेची मंजूरीची आवश्यकता नसल्याचे कळविले.

**प्रश्न क्र.२ः–नविन मु.का.अ.ची नियुक्ती केल्यानंतर त्यांनी पदभार स्विकारल्या बरोबर त्याच महिन्यात (जुलै२०२४)त्यांना विशेष वेतनवाढ देण्याबाबत संचालक मंडळ सभेत विषय पत्रिकेवर विषय आला हे खरे आहे काय ?**

उत्तरः– होय,नविन मुकाअ यांनी अशाप्रकारचा अर्ज स्वतः केलेला होता परंतु चर्चेअंती संचालक मंडळ सभेत याला मंजुरी देण्यात आलेली नाही .सदर अर्ज सर्वानुमते फेटाळण्यात आला.

**प्रश्न क्र.३ः–नवनियुक्त कर्मचाऱ्यांस आपले बँकेच्या नियमावलीनुसार किंवा शासकीय नियमानूसार प्रोबेशन पिरेड नसतो काय ? व त्याच नियमानूसार रूजू होण्याचे पहिल्याच महिन्यात विशेष वेतनवाढ देण्याची तरतुद आहे काय ?(बॅक किंवा शासन सेवानियमावली नमुद करावी)**

उत्तरः–सदर पद रिझर्व्ह बँकेच्या अधिकारात येत असल्याने व रिझर्व्ह बँकेने मुकाअच्या नियुक्तीस दि.२० जुन २०२४ ला मंजुरी प्राप्त झाल्यामुळे प्रोबेशन पिरेड नाही सदर पदास अनुभव मागत असल्यामुळे सदर पदास प्रोबेशन पिरेड नाही.

**प्रश्न क्र.४ः– नवनियुक्त मु.का.अ.श्री.हिवसे यांना आपले बँकेतुन किती वेळा व किती रकमेचे कर्ज देण्यात आले.**

उत्तरः–नवनियुक्त मुकाअ हे बँकेचे नियमित कर्मचारी असल्यामुळे त्यांना दि.०४ जुलै २०२४ ला ११ लाखाचे कर्ज घेतले असून ते कर्ज निरंक झाल्यानंतर दि.०७ ऑगष्ट २०२४ ला रू.२० लाख कर्ज देण्यात आले.

**प्रश्न क्र.५ः– मु.का.अ.श्री.हिवसे व श्री.झाडे या दोघांना एकाच पदावर असतांना मु.का.अ.चे मासीक वेतन देण्यात आले हे खरे आहे काय ? खरे असल्यास एकाच पदाचे दोन वेतन अदा करता येते काय ?**

उत्तरः–मुकाअ श्री.हिवसे यांना दि.०१/०७/२०२४ ला मुकाअचा पदभार देण्यात आला त्यानंतर श्री.झाडे यांना जुन २०२४ नंतर कोणत्याही प्रकारचे वेतन दिलेले नाही .श्री झाडे यांना जुन २०२४ पर्यंत मुदतवाढ दिल्यामुळे तसेच श्री.हिवसे १०/०६/२०२४ ला रूजु झाले.परंतु प्रत्यक्ष कार्यभार स्विकारणेकरीता वेळ लागल्याने वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यात आले.

**प्रश्न क्र.६–तत्कालीन मु.का.अ.श्री.झाडे यांची सेवा ३०/०४/२०२४ पर्यंत होती त्यानंतर त्यांना पुन्हा सेवा मुदत वाढ दिली काय ?दिली असल्यास आरबीआय ला कळविले होते काय ?त्यास आरबीआय ची परवानगी मिळाली काय ?**

उत्तरः–तत्कालीन मुकाअ श्री.झाडे यांना संचालक मंडळ सभा दि.२८/०४/२०२४ ठराव क्र.१७ अन्वयें नविन मुकाअ बँकेत रूजू होईस्तोवर मुदत वाढ देण्यात आली तसे रिझर्व्ह बँकेला माहितीस कळविण्यात आलेले आहे.

**प्रश्न क्र.७ः– सन २०२२–२३ ची ५७ ची आमसभा झाल्यानंतर सन २०२३–२४ मध्ये दि.१७/०३/२०२४ ला पार्वती लॉन साटोडा रोड,आकोली वर्धा येथे बँकेची विशेष आमसभा झाली काय ? झाली असल्यास**

१)विशेष आमसभेच्या विषयसुचीची जाहिरात कोणत्या वर्तमान पत्रात व कोणत्या तारखेस देण्यात आली .पुरावा द्यावा.

२)सदर विशेष आमसभेत किती सभासद उपस्थित होते त्यांची व स्वाक्षरीसह नावे आमसभेच्या सभागृहात वाचून दाखवावी.

३)सदर विशेष आमसभेचे फोटो व व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले काय ? ते या आमसभेत दाखविण्यात यावे.

४)विशेष आमसभेच्या अहवाल पुस्तीकेची छपाई करण्यात येवून सभासदांना वाटप करण्यात आला काय ?छपाईचा एकत्रित खर्च आमसभेत मांडण्यात यावा.

५)विशेष आमसभेत किती विषय घेण्यात आले व त्यास किती उपस्थित सभासदांनी मंजूरी दिली.

उत्तरः–बँकेची अशी कोणतीही सभा झालेली नाही.त्यामुळे वरील प्रश्न लागु होत नाही.

**प्रश्न क .८ः–दि.१७/०३/२०२४ च्या विशेष आमसभेचा पुर्ण खर्च किती झाला व २०२३–२४ च्या ५८ व्या आमसभेत**

**(२२/०९/२०२४ )कोणत्या हेडखाली मंजूरीस ठेवण्यात आला.**

उत्तरः– दि.१७/०३/२०२४ ला विशेष आमसभा झाली नाही त्यामुळे सदर खर्च करण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

**प्रश्न क्र.९ः– आपले बँकेच्या मुख्यालय वर्धा येथे सौर उर्जा पॅनल लावणे सुरू आहे.त्याच्या खरेदीबाबतची जाहिरात कोणत्या वर्तमानपत्रात देण्यात आली.व कोणत्या तारखेला ?त्या जाहिरातीनुसार किती कंपन्याचे कोटेशन प्राप्त झाले ?व बॅकेने कमीतकमी किती दराचे खरेदी केले ?**

उत्तरः–सदर जाहीरात कोणत्याही वृत्तपत्रात देण्यात आली नाही.कारण सोलर पॅनलचे प्रतिनिधींनी बँकेस भेट देवून आपल्या कंपनी विषयीची माहिती सांगितली ,त्यानुसार दि.१५/०७/२०२४ ला शाखेच्या नोटीस बोर्डवर सुचना लावून दि.२५/०७/२०२४ पावेतो निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार चार निविदा प्राप्त झाल्या १.एस व्ही सोलर,वृदांवन नगर वर्धा, २.आदित्य सोलर पॉवर ३.असपायर ग्रुप , ४.विदर्भ असोसिएट यात आदित्य पॉवरची निविदा कमी दराची असल्याने त्यांना आदेश देण्यात आला.

**प्रश्न १०ः– बँकेचे कार्यक्षेत्र वाढविण्यसासाठी सहकार आयुक्त कार्यालय पुणे यांना लिगल फी रू.३ लाख देण्यात आली हे खरे आहे काय ?दिली असल्यास कोणत्या स्वरूपात रोख,आरटीजीएस ,नेफ्ट व युपीआय यापैकी सविस्तरपुराव्यासह सांगावे.**

उत्तरः– सदर प्रकारचा कुठलाही खर्च बँकेनी केला नाही.

**प्रश्न क्र.११ः–बँकेचा नफा कमी झाला म्हणून सभासदांना लाभांश मागील पेक्षा २ टक्केने कमी करण्यात आला तर संचालकांच्या सभा व प्रवासावर रू.३४२५०८/– इतका मोठा ज्यादा खर्च कसा करण्यात आला ?व तो कोणत्या प्रयोजनार्थ केला ?**

उत्तरः– शासन निर्णय ६ जुलै २०२३ च्या परिपत्रकाप्रमाणे संचालक मंडळाचे भत्यामध्ये वाढ झाल्यामुळे सदर खर्चात वाढ झाली.

**प्रश्न क्र.१२ः–शाखा देवळी येथे एकच संचालक असून एप्रिल २०२४ या एका महिन्यात संचालक साहेबाकरीता रू.९००/– लस्सीकरीता खर्च झाला आहे.त्याच महिन्यात आर्वीच्या संचालक साहेबांच्या ज्यूस करीता रू.४२०/– खर्च करण्यात आला ही सर्व सामान्य सभासदांच्या पैशाची लुट नाही काय ? यामुळे लाभांश कमी करण्याचे आपण मान्य करता काय ?**

उत्तर ः–शाखेवर अनेक संचालक साहेबांना भेटी दिल्या तसेच भेटीदरम्यान सभासद सुध्दा उपस्थित राहतात त्यामुळे आदरतिथ्य म्हणून सदर खर्च करण्यात आला.

यानंतर मा.अध्यक्षांनी आजच्या सभेत उपस्थित सर्व सन्मा.सभासदांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वाचे आभार मानून सभागृहाने राष्ट्रवंदनेत सहभाग घेतला व अध्यक्षांनी सन्मा.सभासदांकरीता जेवणाची व्यवस्था केली असून सर्वांनी जेवण करूण घ्यावी अशी विनंती करून सायं.५ वाजता सभा संपल्याचे जाहीर केले.

स्थळ ः–वर्धा
दिनांक ः–२२/०९/२०२४

**हर्षद प्र.हिवसे** — मुख्य कार्यकारी अधिकारी

**मोहन कुंभारे** — अध्यक्ष

**वर्धा जिल्हा परिषद अेम्प्लॉईज (अर्बन)को-ऑप.बँक लि.वर्धा**

# वर्धा जिल्हा परिषद अेम्प्लॉईज (अर्बन को-ऑप.बँक लि.वर्धा



मुख्यालय :- महादेवपूरा,वर्धा दुरध्वनी क्रमांक ०७१५२-२९५५५०

## ****ऋणनिर्देश****

**सन्मा.सभासद बंधु भगिनिनों,**

**सस्नेह नमस्कार,**

आज या ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने, वर्धा जिल्हा परिषद अेम्प्लॉईज अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.वर्धा.च्या सण २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल,ताळेबंद पत्रक ,नफा तोटा पत्रक,अंदाज पत्रक संचालक मंडळाचे वतीने आपणासमोर सादर करतांना तसेच अध्यक्षीय मनोगतातुन आपणा सर्वांशी संवाद साधताना मला अत्यंत अभिमान व समाधान वाटत आहे.

३१ मार्च २०२५ अखेर बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीने आजच्या या सभेसाठी आपली उपस्थिती संस्थेप्रती आदर दर्शवणारी असून आपल्या उपस्थिती बद्दल आपणा सर्वांचे मनापासून स्वागत करतो.आपण आज ज्या प्रगतीच्या टप्प्यावर उभे आहोत त्या टप्पानुसार केवळ आकडेवारीचा विजय नाही तर सहकार विश्वास,तंत्रज्ञान,पारदर्शकता आणि अथक मेहनतीच्या जिंवत उदाहरणाचा परिणाम आहे.

भारतीय अर्थव्यवस्था रू.पाच ट्रिलियन म्हणजेच पाच लाख कोटी करण्याचे उद्दिष्ठ पूर्तीसाठी केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालयाची निर्मिती करून सहकारी बँकांचे बँकिंग क्षेत्रातील योगदानास महत्व प्रदान केलेले आहे.त्यानुसार राष्ट्रीय आर्थिक धोरण आणि सभासदांच्या गरजा पूर्ततेसाठी संचालक मंडळाने सुसंगत अशी धोरणे निश्चित केलली आहेत.

**सन्मान :-**

डिजिटल बँकिंग च्या युगात सर्व परिस्थितींशी सुसंगत ,सकारात्मक आणि सभासदांचे हितार्थ योग्य ते निर्णय संचालक मंडळाने घेतल्यामुळे राज्य पातळीवर पगारदार बँकेच्या गटात आपपल्या बँकेस मानाचा बँको ब्ल्यू रिबन पुरस्कार प्राप्त झालेला आहे.बँकेच्या या यशात आणि विकासात सर्व सभासदांची मोलाची साथ आहेच ती यापुढेही वृध्दिगंत व्हावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

**संचालक मंडळाचे कुशल निर्णय :-**

बँकेच्या यशोगाथेत संचालक मंडळाचा दूरदृष्टीने घेतलेला प्रत्येक निर्णय म्हणजे मजबूत पाया ठरलेला आहे.कर्जावरील व्याजदरात कपात करून सभासदांवरील अधिक भार कमी केला गेला आहे.डिजिटल बँकिंग सेवेमध्ये अधिक गुंतवणुक करून ग्राहकांना अधिक दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.ज्यामध्ये बँकेने नव्याने मोबाईल अप्लिकेशन सुरू केलेली आहे ज्यामधून खातेदारांना त्यांच्या सर्व खात्यांचा तपशिल दिसून येईल.आय.एम.पी.एस.मार्फत सभासदांना त्यांच्या किंवा ईतरांच्या खात्यांवर लगेच पैसे ट्रान्सफर करता येईल.संचालक मंडळाची ही धोरणे केवळ यशाची नव्हे तर विश्वास सुसंवादाची पायाभरणी करणारी ठरली आहेत.

**कर्ज:-**

सभासदांकरीता नव्याने इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे खरेदी करणे करीता रूपये २ लाख पावेतो नव्याने कर्ज योजना सुरू केलेली आहे.तसेच बँकेच्या इतिहासात प्रथमच शासनाचे हर घर सूर्यघर योजनेस पाठबळ देऊन सभासदांचे स्वतःचे घरावर ५ मेगावॅट पावेतो सोलर सिस्टिम बसवणेकरीता ५ लाख पावेतो कर्ज सूर्यघर योजने मार्फत पुरविण्यात येत आहे.तसेच इलेक्ट्रिक वाहण (ईलेक्ट्रिक टू व्हिलर) खरेदी करीता उमंग योजने मार्फत २ लाख पावेतो कर्ज पुरविण्यात येत आहे.

बँकेच्या सभासदांना आता वर्धा जिल्ह्याबाहेर (अमरावती .नागपूर,यवतमाळ ,चंद्रपूर) या जिल्ह्यात सुध्दा स्वतःचे घर खरेदी करीता ४० लाख पावेतो गृह कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**ठेवी :–**

आज मितीस बँकेच्या एकुण ठेवी १२८ कोटी ८० लाख ३३ हजार ३६ रूपयांवर पोहोचल्या आहेत ही वाढ म्हणजे केवळ आर्थिक आकडेवारी नाही तर सर्वसामान्य ग्राहकांचा बँकेवरील विश्वासाचे द्योतक आहे.सर्व ठेवीदारांचे तसेच नियमित ठेवी ठेवणाऱ्या ठेवीदारांचे बँके प्रति ठेवलेल्या विश्वासाबद्दल मी संचालक मंडळाच्या वतीने त्यांचे मनापासून धन्यवाद मानतो.आपल्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही याची ग्वाही देतो.या आर्थिक वर्षात बँकेला ''**अ**'' ऑडिट वर्ग प्राप्त झालेला आहे.बँकेच्या या प्रगतीत बँकेप्रती आपली निष्ठा व विश्वास कारणीभूत असून आपणच त्यांचे खरे शिल्पकार आहात.आपणा सर्वांना मी संचालक मंडळाचे वतीने मनःपूर्वक धन्यवाद देतो व आपल्या ऋणातच राहू इच्छितो.

**नफा :**

बँकेला अहवाल वर्षात रूपये २ कोटी १ लाख २० हजार इतका नफा झाला असून मागल्या आर्थिक वर्षापेक्षा रूपये १७ लाख ५ हजाराची वाढ झालेली आहे.

**एन.पी.ए.:–**

बँकेचा एन.पी.ए.मागल्या वर्षी ९ कोटी ३८ लाख २८ हजार एवढा होता ज्यामध्ये घट होऊन या आर्थिक वर्षात एकूण एन.पी.ए.८ कोटी १३ लाख ०३ हजार एवढा राहिला आहे.तर बँकेचा नेट एन.पी.ए.४३ लाख ९८ हजार इतका असून त्याचे टक्केवारी ०.४५% एवढी आहे.तरीहीपण थकबाकीदार सभासदांना विनंती करण्यात येत आहे की आपल्याकडे असलेल्या थकबाकीचा त्वरीत भरणा करून बँकेस सहकार्य करावे.

**आधार सभासद कल्याण योजनाः–**

सन २००५ नंतर नियुक्ती मिळालेल्या बँकेच्या सभासदांकरीता ज्यांना शासकीय निवृत्ती वेतन लागू नाही(जुनी पेंशन)अश्या सभासदांच्या मृत्यु पश्चात त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना सभादाने घेतलेल्या कर्जाचा भुर्दंड जास्त प्रमाणात पडू नये त्याकरीता बँकेकडून रूपये १ लाख पावेतो आर्थिक मदत करण्याबाबत या संचालक मंडळाने शब्द दिलेला होता विद्यमान संचालक मंडळाने आश्वासित केले होते व सदर आश्वासनाची पुर्तता करून या आर्थिक वर्षात संचालक मंडळाने आधार सभासद कल्याण योजनेकरीता रू.२५ लाख तरतुद केलेली आहे.सदर विषय आपणापुढे मंजुरीकरीता ठेवण्यात आलेला आहे.

**लाभांश :–**

संचालक मंडळाने गेल्या वर्षी दिलेल्या शब्दांनूसार या आर्थिक वर्षात बँकेचा एन.पी.ए.कमी केलेला असून बँकेचा निव्वळ नफा वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे.सभासदांना दिलेल्या वचनानूसार या आर्थिक वर्षाकरीता **१४%** लाभांश प्रस्तावित आहे.

**ऋणनिर्देशः–**

अहवाल वर्षात बँकेच्या विकासासाठी ठेव वृध्दीसाठी तसेच बँकेचे कामकाज चांगले व्हावे यासाठी नियमित सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे प्रति ऋण व्यक्त करून त्यांचे मी विशेष आभार मानतो,बँकेचे सर्व सभासद तसेच संचालक मंडळातील सर्व मान्यवर सदस्य.

